| MHAH070002352026 | नियमित जामीन अर्ज क्र.८३/२०२६ आदेश नि.१<br>आदित्य जगदिश शेळके<br>वि.<br>महाराष्ट्र शासन |
|---|---|

भाग 'अ' प्रकरणाचा तपशील

| | |
|---|---|
| प्रथमखबर क्रमांक व दिनांक | १५/२०२६ दि.०३/०१/२०२६ |
| पोलीस स्टेशन | संगमनेर शहर पोलीस स्टेशन, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, महाराष्ट्र. |
| लावलेली कलमे | भारतीय न्याय संहिता कलम ७७, ७८, ३५१(४), ३५६(२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ A |
| जास्तीत जास्त असलेली शिक्षा | द्रव्य दंडासह ५ वर्षे शिक्षा. |

भाग 'ब' कोठडीत ठेवलेले व प्रक्रियात्मक पालनाचे तपशील

| | |
|---|---|
| अटकेची तारिख | ०६/०१/२०२६ |
| एकूण ताब्यात ठेवलेला कालावधी | दोन दिवस पोलीस कोठडी. |

भाग 'क' खटल्याची स्थिती

| | |
|---|---|
| कार्यवाहीची स्थिती (तपास/दोषारोपपत्र/ दखलपात्र/दोषारोप ठेवणेवर/पुराव्यावर) | नि.०१ चे आदेशावर. |
| दोषारोपपत्रात नमूद असलेल्या साक्षीदारांची संख्या | --- |
| अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची संख्या | --- |

भाग 'ड' गुन्हेगारी पार्श्वभूमी

| | |
|---|---|
| गुन्हा रजि. क्र. व पोलीस स्टेशन | --- |
| कलमे | --- |
| प्रकरणाची स्थिती (प्रलंबीत/निर्दोष-दोषी) | --- |

भाग 'इ' पुर्वीचे जामीन अर्ज

| | |
|---|---|
| न्यायालय | अतिरिक्त सत्र न्यायालय, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर. |
| खटला क्र. | नियमित जामीन अर्ज क्र.१९/२०२६ |

| | |
|---|---|
| | |
| खटल्याचा निकाल | नामंजुर |

भाग 'फ' जबरदस्ती/सक्तीची प्रक्रिया

| | |
|---|---|
| अजामिनपात्र अधिपत्र काढले होते का? | नाही. |
| उद्घघोषित अपराधी घोषित केले का? | नाही. |

१. प्रथमखबर वाचली असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी/पिडीत महिला वय २३ वर्षे डीएमएलटी चे शिक्षण पुर्ण करुन एका लॅबमध्ये इंटर्नशिप करते. देवठाण, ता.अकोले येथील त्यांचा दूरचा नातेवाईक आदित्य जगदीश शेळके सोबत तिची ओळख होऊन ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर **त्याने पिडीतेला ब्लॅकमेल करुन, तिचे विवस्त्र फोटो काढून, व्हायरल केले आणि सदर फोटो व्हॉटसअप ॲपवरुन पिडीतेच्या नातेवाईकांना टाकले**. त्याबाबत पिडीतेने संगमनेर शहर पोलीस स्टेशन येथे दि.१६/०५/२०२५ रोजी आदित्य जगदीश शेळके चे विरुध्द तक्रार दिली होती.

२. प्रथमखबरमध्ये पुढे असे नमूद आहे की, २ महिन्यांपासून **आदित्य शेळके** हा त्याचे इन्स्टाग्राम आय. डी. SEX_Love_1211 आणि त्याची लिंक सोशल मिडीया ॲपवर अकाऊंट तयार करुन **पिडीतेचे इन्स्टाग्राम अकाऊंटवर तिला फॉलो करुन तिचे अश्लिल फोटो, त्यांचे सोबत असलेले फोटो टाकत होता**. पिडीतेने त्याला फोन करुन का त्रास देतो? असे विचारले असता **त्याने "एक तर आत्महत्या कर नाहीतर माझ्याकडे ये" अशी धमकी दिली**.

३. प्रथमखबरमध्ये पुढे असे नमूद आहे की, एक दिवस आदित्य शेळके ने नाशिकमध्ये भेटण्यासाठी पिडीतेला बोलवले. त्यास पिडीतेने नकार दिला असता आदित्यचे तिन मित्रांनी पिडीतेला फोन करुन "तू आदित्य शेळकेला भेटण्यास नाही

आली, आता आम्ही तुझ्या रुमवर येतो, तुला रेप काय असतो ते सांगतो, तुझ्या घरच्यांना जिवंत मारुन टाकतो''. अशी धमकी दिली. **आदित्य शेळके ने पिडीतेला धमकी देऊन इन्स्टाग्राम ॲपवर अकाऊंट तयार करुन सदर अकाऊंट त्यानेच बनवल्याचे सांगून त्या अकाऊंटचे बायो मध्ये पिडीतेचे नावासह "full video** 100 **share karo video photo**. **Rand तर ती आहे. जी एकाची होऊन दुसऱ्याची झाली. खोट बोलण तिच्या रक्तात" असे टाकून पिडीतेचे सर्व नातेवाईकांना फॉलो करुन दि.३०/१२/२०२५ रोजी व दि.३१/१२/२०२५ रोजी पिडीतेचे विवस्त्र दोन फोटो व व्हिडीओ टाकले व sex_love_**1211 **या अकाऊंटवरुन पिडीतेचे विवस्त्र असलेले फोटो व व्हिडीओ, पिडीत नाचत असलेले व्हिडीओ ठेऊन, तिला लज्जा उत्पन होईल अशी कृती करुन, बदनामी केली आणि तिचा छुपा पाठलाग केला**. आदित्य जगदिश शेळके व त्याचे तीन मित्र यांचे विरुध्द प्रथमखबर पिडीत ने संगमनेर शहर पोलीस ठाण्यात दि.०३.०१.२०२६ रोजी दुपारी १२.२७ वा. दिली. त्यानुसार त्यांचे विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७८, ३५१(४) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ A अन्वये गुन्हा रजि. क्र.१५/२०२६ नोंद झाला.

४. अर्जदार आदित्य शेळके चे जामीन अर्जातील कथने व त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री. जे. एच. वामन यांचा युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी निर्दोष असून त्याचे विरुध्द बनावट गुन्हा दाखल झाला आहे. पिडीत व आरोपी हे नातेवाईक असून त्यांचे प्रेमसंबंध होते. मात्र लग्नाविषयी दोघांमध्ये तीव्र मतभेद झाल्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा विचारपूर्वक दाखल केला. फिर्याद अतिविलंबाने दाखल केली असून विचारपूर्वक तसेच कपोलकल्पित आहे. सकृतदर्शनी फिर्यादच संशयास्पद आहे. पिडीत/फिर्यादीने इन्स्टाग्राम अकाऊंट बनवले असून ते अर्जदार/आरोपीने बनवले नाही. सदर गोष्टीची सत्यता पुराव्या अंतीच समोर येणार आहे. त्याकरीता आरोपीस कोठडीत ठेवणे योग्य

नाही. गुन्हा तांत्रीक स्वरुपाचा असल्याने तांत्रीक बाबींची पुर्तता केल्याशिवाय त्याची सत्यता न्यायालयासमोर येणे अवघड आहे. अभियोग पक्षाचा पुरावा सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा असल्याने त्यासाठी भारतीय साक्षी संहितेतील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र प्रस्तुतचे दोषारोप पाहता असे कोणतेही पालन झालेले दिसत नाही. खटल्यामध्ये लागू केलेली कलमे ही देखील केवळ ५ ते ७ वर्षांच्या शिक्षेपुरती मर्यादित आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम ३५ प्रमाणे नोटीस देणे गरजेचे असताना देखील पोलीसांनी सदर नोटीस दिली नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाचे अर्नेषकुमार केसमध्ये घालून दिलेल्या तत्वांची पायमल्ली झालेली आहे. गुन्हयातील कलमांना केवळ ३ ते ७ वर्षे असा कारावास नमूद केला असल्याने आरोपी जामीनासाठी पात्र आहे. खटल्यातील तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. त्यामुळे आरोपीला कोठडीत ठेवण्याची गरज नाही. अर्जदार/आरोपीने पूर्वी दाखल केलेला जामीन अर्ज क्र.१९/२०२६ तपास अपूर्ण असल्याचे मुदयावरुन नामंजुर झाला. मात्र आता तपास पूर्ण झाला असल्याने आरोपी जामीन मिळणेस पात्र आहे. अर्जदार/आरोपीचे विरुध्द पूर्वी दाखल झालेला गुन्हा असाच तांत्रीक स्वरुपाचा असून ते शाबीत झालेले नाही. त्यामुळे अर्जदार/आरोपीचे विरुध्दचे प्रलंबित गुन्हयांमुळे आरोपी जामीन मिळविणेस अपात्र आहे असे म्हणणे योग्य नाही. अर्जदार/आरोपी देवठाण, ता. अकोले येथील कायमचा रहिवासी असून तिथे त्याची शेती व घर आहे. त्यामुळे तो परागंदा होणार नाही. अर्जदार/आरोपी न्यायालयाच्या अटींचे पालन करेल. अर्जदार/आरोपी दोन महिन्यांपासून तुरुंगात आहे, त्यास खटला चालविण्यापुर्वी शिक्षा देणे योग्य नाही.

५. सुविद्य अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. बी. जी. कोल्हे यांचे म्हणणे नि.९ मधील कथन व युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपी क्र.१ ने

SEX_Love_1211, आय.डी. तयार करुन फिर्यादीचे अश्लील विवस्त्र फोटो व व्हिडीओ ठेवून फिर्यादी/पिडीतेची बदनामी करुन तिस लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे. आरोपीवर यापुर्वी संगमनेर शहर पो.स्टे. येथे गु.र.नं.४८५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ७८, ३५६(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल असतांना देखील त्याचे वर्तनात सुधारणा झाली नाही. अर्जदार/आरोपीने फिर्यादीचे विवस्त्र फोटो स्टोअर करुन ठेवल्याची शक्यता असून त्यास जामीन मंजुर झाल्यास तो पुन्हा सदर फोटो सोशल मिडीयावर प्रसारित करण्याची शक्यता आहे. अर्जदार/आरोपी विरुध्द फिर्यादी दिल्याचा राग मनात धरुन गुन्हयातील फिर्यादी व साक्षीदार यांना क्षती पोचवून गंभीर स्वरुपाचा शरिरीविरुध्दचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अर्जदार/आरोपीचा जामीन अर्ज मंजुर झाल्यास त्याच्या हातून पुन्हा अशाच प्रकारचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडण्याची दाट शक्यता आहे. अर्जदार/आरोपीस कायद्याचा धाक राहाणार नाही. तो न्यायालयात तारखांना हजर राहणार नाही. अर्जदार/आरोपी फिर्यादी व साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६. अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. बी. जी. कोल्हे यांचा पुढे युक्तीवाद आहे की, अर्जदार/आरोपी विरुध्द पुर्वी नोंद झालेला गुन्हा रजि. क्र.४७८/२०२५ कामी मिळालेल्या जामीनाच्या अटी व शर्तींचा भंग अर्जदाराने करुन नविन गुन्हा केला आहे. त्याला जामीनावर सोडल्यास पुन्हा या स्वरुपाचा गुन्हा करेल.

७. फिर्यादी/पिडीततर्फे म्हणणे नि.१० मधील कथन व त्यांचे सुविद्य विधिज्ञ श्रीमती. व्ही. डी. दिघे यांचा युक्तीवाद असा आहे की, अर्जदार/आरोपी फिर्यादी/पिडीतेला जीवे मारण्याची धमकी देऊन गैरकृत्य व गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला आहे. अर्जदार/आरोपी पिडीतेच्या instagram अकाउंट फॉलो करून अश्लील फोटो टाकून पिडीतेला ब्लैकमेल करत होता. अर्जदार/आरोपीचे तीन मित्रांनी सुद्धा

फिर्यादी/पिडीतेला फोन करून तू आदित्य ला भेटण्यास नाही आली, आता आम्ही तुझ्या रूमवर येतो, तुला रेप काय असतो ते सांगतो, तुझ्या घरच्यांना जिवंत मारून टाकतो, अशी देऊन गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला. अर्जदार/आरोपीने स्त्री चरित्राला कलंक लागेल असे घृनास्पद, लज्ञास्पद तसेच स्त्री जातीची बदनामी होईल असे कृत्य केले आहे. फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी अर्जदार/आरोपीने दिल्यामुळे फिर्यादीचे जिवीतास धोका निर्माण झाला आहे. अर्जदार/आरोपीने फिर्यादीस एक तर आत्महत्या कर नाहीतर माझ्याकडे ये या प्रकारची धमकी दिली आहे. अर्जदाराने त्याचे मित्रांना फोनवरुन देखील धमकी देण्यास भाग पाडले आहे. असे असताना अर्जदाराचा जामिन मंजुर केल्यास तो फिर्यादीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त करेल. अर्जदार/आरोपीने जे अकाऊंट बनवले आहे त्या अकाऊंटवर फिर्यादीचे विवस्त्र फोटो, विवस्त्र व्हिडीओ टाकून फिर्यादीची बदनामी केली आहे. अर्जदाराचा जामिन मंजुर झाल्यास तो पुढेही तिची बदनामी वेगवेगळे सोशियल मिडीयावर आकाऊंट निर्माण करून विवस्त्र फोटो व विवस्त्र व्हिडीओ टाकेल. सदरच्या केसमध्ये डिजीटल इव्हीडंस असून त्याचा सायबर फॉरेंसिक रिपोर्ट येणे बाकी असून अर्जदार सदर पुराव्यामध्ये छेडछाड करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदाराचे मित्रांनी अर्जदारास भेटण्यास नाही आली तर आता आम्ही तुझ्या रूमवर येतो, तुला रेप काय असतो ते सांगतो, तुझ्या घरच्यांना जिवंत मारुन टाकतो अशी फोनवरुन धमकी दिली आहे. अर्जदाराचे सदरचे फोन नंबरवाले मित्र अजूनही फरार असल्याने सदरची धमकी अर्जदार बाहेर पडल्यानंतर खरी करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अर्जदाराचा जामिन अर्ज मंजुर झाल्यास फिर्यादीची बदनामी होईल व अर्जदारास कायद्याचे कुठलेही भय राहणार नाही. जरी दोषारोपपत्र दाखल झाले असले तरी अर्जदार फिर्यादीचा दुरचा नातेवाईक असल्याने तो गुन्ह्यातून सुटल्यानंतर इतर नातेवाईकांमार्फत अथवा स्वतः मुळ फिर्यादी व साक्षीदार यांचेवर दबाव टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदाराने अर्जामध्ये फिर्यादीचे

विरुध्द खोट्या, निराधार तक्रारी उपस्थित केल्या आहेत. जामिन अर्जातील सर्व कारणे खोटी व बनावट स्वरुपाची आहेत. अर्जदार आडदांड, रागीट स्वभावाचा असून त्यास कायद्याचे भय नाही. न्यायालयाने जामीन मंजुर केल्यास तो परागंदा होईल.

८. विवाद्य कथने, अभियोग पक्षाने दाखल केलेली तपासाची कागदपत्रे व युक्तीवाद साकल्याने विचारात घेतला. अर्जदार/आरोपीला दि.०६.०१.२०२६ रोजी अटक केली. अर्जदार/आरोपी दि.०९/०१/२०२६ पर्यंत पोलीस कोठडीत व नंतर न्यायालयीन कोठडीत आहे. अर्जदार/आरोपी विरुध्द दि.१६/०५/२०२५ रोजी फिर्यादी/पिडीत संबंधीत संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र.४५८/२०२५ नोंद झाला होता. सदर प्रकरणात मिळालेल्या जामीन अटी व शर्तींचे उल्लघंन करुन अर्जदार/आरोपीने पुन्हा त्याच पिडीतेसोबत त्याच स्वरुपाचा गुन्हा केला आहे.

९. अर्जदार/आरोपीच्या ताब्यातून दि.०३/०१/२०२६ रोजी त्याचा वापराता मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये अर्जदार/आरोपीने पिडीतेला मोबाईलवर लज्जास्पद व अश्लाघ्य भाषेत मजकुर पाठवले आहे. सदरचा मजकुर हा मजकुर टाकणा–या व्यक्तीची विकृत मनोवृत्ती दर्शवते.

१०. गुन्हा रजि. क्र.१५/२०२६ चा तपास पुर्ण होऊन दि.२६/०२/२०२६ रोजी न्यायदंडाधिकारी यांचेकडे दोषारोपपत्र दाखल झाले आहे. २०२६ चा खटला या न्यायालयाकडे वर्ग होऊन, दोषारोपनिश्चिती होऊन, साक्षीदारांच्या साक्षी नोंदवून न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागेल. इतका कालावधी अर्जदार/आरोपी क्र.१ यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे प्रयोजन नाही. त्यामुळे अटी व शर्तींना अधीन राहून त्यास जामीन मंजुर करणे न्यायोचित हाईल.

## आदेश

अ. नियमित जामीन अर्ज क्र.८३/२०२६ मान्य केला आहे.

ब. संगमनेर शहर पोलीस ठाणेचा गुन्हा रजि.क्र.१५/२०२६ चे कामी अर्जदार/आरोपी क्र.१ आदित्य जगदीश शेळके चा रक्कम रुपये ६०,०००/- चा वैयक्तिक जात मुचलका व जामीनदार स्वीकारुन त्याला जामीनावर मुक्त करण्यात यावे.

क. गुन्हा रजि. क्रमांक १५/२०२६ मधील फिर्यादी व साक्षीदार यांच्याशी अर्जदार/आरोपी क्र.१ ने कोणत्याही स्वरुपाचा संपर्क करु नये, त्यांच्यावर दबाव, दडपण, धाक, अमिष, प्रलोभन ईत्यादींचा वापर करु नये.

ड. गुन्हा रजि. क्रमांक १५/२०२६ चे पुराव्यामध्ये अर्जदार/आरोपी क्र.१ ने कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप, छेडछाड व फेरफार करु नये.

इ. अर्जदार/आरोपी व जामीनदार यांनी त्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना यांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची सत्यप्रत जामीन देतेवेळी सादर करावी.

ई. संबंधित न्यायदंडाधिकारी यांच्याकडे जामीन दयावा.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2026.03.18 17:10:37 +0530

संगमनेर (मंदार नेरलेकर)

दिनांक -१८/०३/२०२६. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

संगमनेर.